दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.११ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 11 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 54 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## राजकीय हस्तक्षेप सहन केला जाणार नाही

**मुंबई**–अजित पवारांनी ठाम भूमिका घेत सांगितले की, राजकीय नेत्यांच्या दबावाखाली पोलिसांनी निर्णय घेऊ नयेत. कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करायची, एवढेच काम आहे. शिफारस कोणाची आहे हे गौण आहे. ते पुढे म्हणाले की, गेल्या ३२ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत मी नेहमी सांगतो, एखाद्या फाईलवर माझी शिफारस असली, तरी जर ती वस्तुस्थितीला धरून नसेल, तर सचिव किंवा पोलिसांनी लक्षात आणून द्यावे. जर तरीही चुकीच्या शिफारशीवर निर्णय झाला, तर तो मंत्री दोषी ठरेल. अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे आता योगेश कदम यांच्या भूमिकेवर नवे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# ओबीसींचा सरकारला 'मुंबई-पुणे जाम' चा थेट इशारा

## नागपुरात महामोर्चा काढून मराठा आरक्षणाच्या जीआरला तीव्र विरोध

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर (वृत्तसंस्था)**

नागपूर येथे सकल ओबीसी संघटनांनी शुक्रवारी महामोर्चा काढत सरकारला इशारा दिला आहे. मराठा आरक्षणासाठी कोंडी करण्याचा निकष लावला जात असेल, तर आम्ही मुंबई, पुणे आणि ठाणेही 'जाम' करू, असे ओबीसी समाजाने म्हटले आहे. यामुळे मराठा आणि ओबीसी समाजात पुन्हा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे.मराठा आरक्षणासाठी काढण्यात आलेला २ सप्टेंबरचा जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा यशवंत स्टेडियम ते संविधान चौकदरम्यान काढण्यात आला. संविधान चौकात मोर्चाचा समारोप झाला. या शिस्तबद्ध आंदोलनात राज्यभरातून हजारो ओबीसी बांधवांनी सहभाग घेतला. विदर्भ आणि कोकणातूनही अनेक ओबीसी बांधव उपस्थित होते.यावेळी ओबीसी नेते लक्ष्मण हाके, महादेव जानकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री सुनील केदार, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, भंडाऱ्याचे खासदार प्रशांत पडोळे, आमदार बाळासाहेब मांगुळकर, प्रकाश अण्णा शेंडगे, रवींद्र दरेकर, नरेंद्र जिचकार आदी प्रमुख उपस्थित होते.

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना इशारा दिला. मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात हवा तसा जीआर काढला. कोंडी करणे हाच निकष असेल तर आम्हीही मुंबई, पुणे आणि ठाणे 'जाम' करू, असे वडेट्टीवार म्हणाले.वडेट्टीवार यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, जरांगेच्या दबावाखाली सरकार झुकले. ३४७ मूळ जाती आणि पोटजाती मिळून तब्बल ८८१ जातींचा ओबीसीत समावेश आहे, ज्यांना ५६ टक्के समाज असूनही केवळ २७ टक्के आरक्षण मिळते.दुसरीकडे, मराठा ही एक जात असून त्यांना १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण असतानाही ओबीसीत समाविष्ट केले जात आहे. हा अन्याय असल्याचे त्यांनी म्हटले.वडेट्टीवार यांनी पुढे आरोप केला की, 'माझा डीएनए ओबीसी आहे' असे म्हणणाऱ्या नेत्यानेच ओबीसींचा गळा कापला. जीआर त्यांनीच काढला आणि राजकारणाचा आरोप आमच्यावर केला जात आहे. आता जाती उपवर्गीकरणाचा खटाटोप केला जात आहे. धनगर आणि आदिवासींना एकमेकांसमोर उभे केले, बंजारा समाजात असंतोष निर्माण केला. सर्व जातीजमातींमध्ये फूट पाडून हे सरकार मजा घेत आहे. 'तुझेही नाही आणि माझेही नाही घाल कुत्र्याला' अशी परिस्थिती निर्माण करून आरक्षणच मुळापासून संपुष्टात आणण्याचे कारस्थान रचण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.




## राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक भाऊ वाघमारे यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी अशोक भाऊ वाघमारे यांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार यांच्या आदेशाने व

बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या शिफारशीने अशोक भाऊ वाघमारे यांना छत्रपती संभाजी नगर येथील पक्षाच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष सुनील भाऊ मगरे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

अशोक भाऊ वाघमारे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यापासून पक्षात एकनिष्ठ राहून काम करत आहेत. त्यांनी सुरुवातीच्या काळात मागासवर्गीय विभागाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी




काम केले आहे. त्यानंतर त्यांना कामाची पावती म्हणून पक्षाने जिल्हा सरचिटणीस पदी निवड करून काम करण्याची संधी दिली. त्यांच्या याच एकनिष्ठतेचे फळ म्हणून सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. त्यामुळे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल! पीक पंचनामे आणि एम एस पी खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्याची किसान मोर्चाची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्हा किसान मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक तातडीचे निवेदन सादर केले आहे. सलग पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे आणि हवामानातील बदलांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. हे निवेदन तहसिलदार, तळोदा यांच्यामार्फत मुंबई येथील मंत्रालयात पाठवण्यात आले आहे. निवेदनावर किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष श्याम राजपूत, जिल्हा अध्यक्ष महेंद्रभाई पाटील, जिल्हा सरचिटणीस प्रविणसिंग राजपूत आणि तालुका अध्यक्ष महेश नवले यांच्या सह्या आहेत.किसान मोर्चाने आपल्या



निवेदनात शेतकऱ्यांचे नुकसान आणि त्यांना दिलासा देण्यासाठी तीन प्रमुख मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे त्यामध्ये

पी एम आशा योजनेअंतर्गत सोयाबीन, भात, कडधान्ये, मका आणि कापूस या सर्व शेतमालासाठी हमीभावाने सरकारी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची विक्री योग्य दरात करता येईल आणि होणारे आर्थिक नुकसान टाळता येईल.तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे तात्काळ पूर्ण करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत निधीचे वाटप गतीने करावे.व सध्याच्या परिस्थितीत शासनाची तातडीची मदत शेतकऱ्यांसाठी अत्यंत गरजेची असल्याचे निवेदनात नमूद आहे.,पीक विमा योजनेतील तरतुदी गतवर्षीप्रमाणे पुर्ववत लागू कराव्यात. जेणेकरून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा लाभाची रक्कम वेळेवर मिळून दिलासा मिळू शकेल. निवेदनात पुढे म्हटले आहे की, सध्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास डगमगला आहे. जर या मागण्या त्वरित पूर्ण झाल्यास, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि ते पुन्हा शेती व्यवसायाकडे अधिक प्रेरित होतील. सध्याच्या कठीण काळात शासनाने तातडीची मदत देणे हाच शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठा दिलासा ठरू शकतो, असे किसान मोर्चा, जिल्हा नंदुरबार तर्फे आवाहन करण्यात आले आहे.या गंभीर प्रश्नाकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने लक्ष देऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा किसान मोर्चाने व्यक्त केली आहे.

## न्यायमूर्तीवरील हल्ल्याच्या निषेधार्थ केज मध्ये तीव्र निदर्शने

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीवर झालेल्या हल्ल्याच्या निषेध व्यक्त करण्यासाठी दि. १३ ऑक्टोबर रोजी केज येथील तहसील कार्यालयावर सर्व पक्षीय आंबेडकर प्रेमी आणि न्यायसंस्थेवर विश्वास असणाऱ्या घटकांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत.देशाचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण कुमार गवई यांच्यावर एका मनुवादी विचारसरणीच्या एका वकिलाने भर न्यायालयात बूट फेकून त्यांच्या जीविताला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याचे हे कृत्य म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायसंस्थेवर केलेला हल्ला असून सरन्यायाधीश यांना मारण्याचा प्रयत्न करणारा हा जातीवादी आणि मनुवादी विचारसरणीचा वकील याच्यावर खुनाचा प्रयत्न करणे आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. तसेच




त्याचे समर्थन करणाऱ्या विरुद्ध मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी. तसेच देशाच्या न्यायव्यवस्थेवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोराला आणि त्याचे समर्थ करणाऱ्याला फासावर लटविण्यात यावे या मागणीसाठी दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोमवारी ११:०० केज तहसील कार्यालयावर सर्व पक्षीय निदर्शने करण्यात येणार आहेत.

त्या आंदोलनात केज तालुक्यातील विविध पक्ष, संघटना यासह आंबेडकरी आणि संविधानप्रेमी नागरिकांनी सहभागी होण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर रोजी केज येथील विश्राम गृहावर सर्वपक्षीय बैठक झाली या बैठकीला दीपक कांबळे, दिलीप बनसोडे, रविंद्र जोगदंड, कपिल मस्के,अशोक गायकवाड,चंद्रकांत खरात, आम्रपाली गजेशिव, अश्रुबा खरात, बाळासाहेब जाधव, समाधान बचुटे, किरण कसबे, विवेक बनसोड, किरण जोगदंड, यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच निदर्शन संबंधी तहसीलदार राकेश गिड्डे यांना निवेदन देण्यात आले आहे.

## पुण्यात २ नोव्हेंबरला 'पुणे रन फॉर युनिटी' महामॅरेथॉन

दैनिक वादळ वार्ता

**'पुणे (वृत्तसंस्था)**

भारताचे लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त पुण्यात 'पुणे रन फॉर युनिटी' महामॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली. रविवार, २ नोव्हेंबर रोजी स. प. महाविद्यालय, टिळक रोड येथे संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने हा उपक्रम होणार आहे. खासदार मोहोळ यांनी सांगितले की, हा उपक्रम सर्व वयोगटातील नागरिकांना फिटनेस, एकता आणि राष्ट्रीय सलोखा या मूल्यांभोवती एकत्र आणणारा एक मोठा सार्वजनिक क्रीडा सोहळा ठरेल. २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरदार पटेल यांची जयंती



'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी केली जाते. या निमित्ताने देशभरात 'रन फॉर युनिटी' (राष्ट्रीय एकता दौड) आयोजित केली जाते.यापूर्वी नवी दिल्ली, मुंबई, अहमदाबाद, बेंगळुरू, हैदराबाद, चंदीगड, जयपूर आणि लखनऊ या प्रमुख शहरांमध्ये हा उपक्रम घेण्यात आला आहे. यंदा पुण्यात प्रथमच राष्ट्रीय एकता दौड आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, मात्र नाव नोंदणी करणे बंधनकारक आहे.यावर्षीच्या 'पुणे रन फॉर युनिटी'मध्ये आंतरराष्ट्रीय खेळाडूंसह अंदाजे २०,००० धावपटू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. केनिया आणि इथिओपियासारख्या देशांतील आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटूंना आमंत्रित करण्यात आले असून, काहींचा सहभाग निश्चित झाला आहे. तसेच भारतातील नामांकित राष्ट्रीय धावपटूंनाही निमंत्रित केले आहे.विजेत्यांसाठी एकूण १० लाख रुपयांचे रोख पारितोषिक ठेवण्यात आले आहे. २१ किलोमीटर श्रेणीतील विजेत्या पुरुष आणि महिला खेळाडूंना प्रत्येकी १ लाख रुपये प्रथम पारितोषिक म्हणून दिले जाईल. पुणेकरांसह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन 'एक भारत-श्रेष्ठ भारत' या ध्येयाला हातभार लावावा, असे आवाहन मुरलीधर मोहोळ यांनी केले. सहभाग आणि नोंदणीसाठी दिलेल्या क्यूआर कोडचा वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## तोतया डॉक्टर जेरबंद: धडगाव रस्त्यावर 'जय मंगला देवी प्लाझा'समोर बनावट दवाखाना उघडकीस

दैनिक वादळ वार्ता


**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्यातील धडगाव मोलगी रस्त्यावरील जय मंगलादेवी प्लाझा समोरील एका पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीररित्या वैद्यकीय व्यवसाय चालवणाऱ्या एका तोतया डॉक्टरला स्थानिक पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ही कारवाई करण्यात आली असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धडगाव तालुका आरोग्य अधिकारी कस्ताल शिवाजी पावरा (रा. तळोदा) यांना धडगाव रस्त्यावर बनावट दवाखाना चालवला जात असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर, ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५:३० वाजताच्या सुमारास आरोग्य पथकाने केशव आत्माराम पावरा यांच्या मालकीच्या पत्राटी शेडवर छापा टाकला. छाप्यादरम्यान, नागेंद्र बहादूरसिंग ऑकारसिंग राजपूत (मूळ रा. उत्तर प्रदेश, ह.मु. खुंटामोडी, धडगाव) नावाचा व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय करताना आढळून आला. आरोपीकडे वैद्यकीय व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही प्रमाणपत्र किंवा अधिकृत वैद्यकीय पदवी नव्हती. तो केवळ लोकांची फसवणूक करून आर्थिक फायदा मिळवण्याच्या उद्देशाने हा व्यवसाय चालवत होता. तोतया डॉक्टर नागेंद्र राजपूत याला तात्काळ ताब्यात घेण्यात आले. आरोग्य अधिकाऱ्यांच्या तक्रारीनुसार, शहादा पोलीस ठाण्यात रात्री ११:०७ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीवर खालील कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भा.न्या.सं. कलम: ३१८ (४), ३१९ (२), ३३६ (२), ३४० (२) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ कलम: ३३, ३३ ए, ३५ व ३६ पोलिसांनी घटनास्थळावरून ६,०१८/- रुपये किमतीचे विविध कंपनीचे औषधी साहित्य जप्त केले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला असून, पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अधिक तपास सुरू असून, आरोपीने किती लोकांची फसवणूक केली याचा शोध पोलीस घेत आहेत.अशाप्रकारे कोणतीही अधिकृत पदवी नसताना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींबाबत तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात किंवा आरोग्य विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. बनावट डॉक्टरांकडून उपचार घेणे हे नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते.

संपादकीय

# वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता



येथे राज्यानिहाय फरकांचे निरीक्षण करणे आवश्यक आहे कारण ती समाजशास्त्रीय आणि प्रशासकीय निकष प्रतिबिंबित करतात. मध्य प्रदेशमध्ये २०२३ मध्ये नोंदवलेली ५,७३८ प्रकरणे आणि महाराष्ट्रातल्या ५,११५ प्रकरणांमधून दिसते की मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये वृद्धांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांचे प्रमाण जास्त आहे. यामागील कारणांमध्ये स्थानिक कुटुंबीय संदर्भ, आर्थिक ताणतणाव, जिल्हास्तरीय रोजगार अवस्था, शहरीकरण आणि स्थानिक पोलीस व्यवस्थेची कार्यक्षमता ह्यांचा समावेश असू शकतो. तसेच छत्तीसगडसारख्या काही राज्यांत वृद्ध हत्येचे दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असल्याचे नोंदले गेले आहे, ज्यामुळे गंभीर गुन्ह्यांचा स्थानिक पॅटर्न समजून घेणे आवश्यक ठरते. महानगरांमध्ये दिल्ली, मुंबई आणि बंगळूरु यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्धच्या प्रकरणांमध्ये उत्पन्न होत असलेले बदल आणि काही शहरांमध्ये झालेली वाढ हे सूचित करतात की शहरीकृत जीवनशैलीचा वृद्धांच्या सामाजिक सुरक्षा व सहभागावर प्रतिकूल परिणाम होत आहे.या परिस्थितीत सामाजिक आणि प्रशासकीय उपाय यांची गरज तातडीची आहे आणि ते उपाय बहुआयामी असावे लागतील. कायदा आणि न्यायप्रणालीच्या पातळीवर ए नोंदणीचे नियम सुलभ करणे (उदा. घरबसल्या ऋखठ नोंदणी, मोबाइल पोलीस सेवा), वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष हेल्पडेस्कची स्थापना, पोलीस प्रशिक्षणामध्ये वयोवृद्ध संवेदनशीलता समाविष्ट करणे आणि त्वरित वैद्यकीय व मानसिक सहाय्य उपलब्ध करून देणे हे प्राथमिक पावले असावीत. स्थानिक पातळीवर 'वयोवृद्ध सुरक्षा समित्या' वा 'वृद्ध सुरक्षा युनिट्स'ची स्थापना करणे जिथे समाजकार्य, पोलीस, आरोग्य व कायद्यातील प्रतिनिधी एकत्र येऊन स्थानिक समस्यांचा वेळीच शोध घेतील आणि तातडीची मदत पुरवतील अशी यंत्रणा प्रभावी ठरू शकते. आर्थिक सुरक्षेसाठी पेन्शन योजनांचे पारदर्शक व वेगवान वितरण, वयोवृद्धांना लक्षित आरोग्य विमा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम, तसेच बँक आणि नान-बँक आर्थिक संस्थांकडून वृद्धांसाठी व्यवहार पुष्टीकरणाची विशेष पद्धत लागू करणे हे देखील आवश्यक आहे. या पद्धतींमुळे सायबर-ठगी व ऑनलाइन फसवणुकीवरही परिणाम होऊ शकेल.समाजशास्त्रीय बदल घडविणे म्हणजे दीर्घकालीन काम यासाठी माध्यमे, शाळा-शिक्षण संस्था आणि समुदाय-नियोजकांची भूमिका निर्णायक आहे. माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये 'वृद्ध सन्मान' किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल; तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले तर वृद्धाचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील. याशिवाय सामाजिक निर्बंध, कुटुंबीय दायित्वांची पुनर्बांधणी आणि आर्थिक सहभाग वृद्धांना अधिक सक्षम करतील. महत्त्वाचे म्हणजे एनसीआरबीकडून प्रकाशित झालेली आकडेवारी ही केवळ दिशादर्शक आहे पण वास्तविकतेतील अनेक प्रकरणे नोंद न झाल्यामुळे ती पूर्ण चित्र दर्शवत नाहीत. अनेक वृद्ध सामाजिक लज्जा, कुटुंबीय दबाव किंवा आरोग्य कारणास्तव तक्रार नोंदवण्यापासून दूर राहतात; म्हणून स्थानिक स्तरावर सर्वेक्षण, नागरिक मूहांकडून गोळा केलेला अनुभव आणि स्वयंसेवी संस्थांचा डेटा धोरणनिर्मितीत समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यायोगे संख्यात्मक डेटाच्या पलीकडे असलेल्या सामाजिक वास्तवाचा अभ्यास करता येईल. तसेच दोषारोप सिद्धी आणि शिक्षा प्रक्रियेत वेग आणणे हे देखील गरजेचे आहे कारण आरोपींना योग्य वेळी शिक्षा न मिळाल्यास पुनरावृत्तीची शक्यता वाढते आणि पीडितांचा न्यायप्रणालीवरील विश्वास ढासळतो.शेवटी, निष्कर्ष म्हणून असे म्हणता येईल की एनसीआरबीच्या ताज्या आकडेवारीने जे द्योतक दर्शविले आहेत. राज्यनिहाय फरक, महानगरांमधील धोके, आर्थिक व डिजिटल फसवणुकीची वाढ आणि घरगुती हिंसाचाराचे विषारी स्वरूप हे केवळ तात्पुरते सामाजिक प्रश्न नाहीत, तर व्यापक धोरणात्मक, प्रशासकीय आणि सांस्कृतिक हस्तक्षेपांची गरज ओळखून तीव्रपणे हाताळली पाहिजे. जर शासन, स्थानिक संस्था, बँका, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांनी समन्वित प्रयत्न केले, तर वृद्धांना केवळ कायदा आणि पोलीस संरक्षण नसून, आर्थिक सुरक्षितता, डिजिटल साक्षरता, मानसिक आरोग्य समर्थन आणि सामाजिक प्रतिष्ठा ह्या सर्व बाजूंनी बळकटी मिळू शकते. यामुळे वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता सुनिश्चित होईल आणि समाजाचे नैतिक व सामाजिक आरोग्य सुधारले जाईल. एनसीआरबीच्या अहवालाने वाजवलेली या संदर्भातील धोक्याची घंटा जर आपण ऐकली आणि धाडसाने काम केले तरच आमचे ज्येष्ठ नागरिक सुरक्षित, सन्मानित आणि सहभागी जीवन जगण्यासाठी स्वायत्त होतील; अन्यथा या आकडेवारीमागील गंभीर संकेत दीर्घकाळासाठी समाजाला मोलाचे नुकसान करू शकतात.

### अस्तंबा यात्रा उत्सवावर यंदा ड्रोन कॅमे-याचा वॉच

# यात्रेच्या पार्श्वभूमीवर अस्तंबा ग्रामस्थ व पोलीस प्रशासनाची संयुक्त बैठक

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**

सालाबादा प्रमाणे यावर्षी देखील अस्तंबा ऋषींच्या यात्रेला दिनांक १८ ऑक्टोबर पासून प्रारंभ होणार असून ही यात्रा २१ ऑक्टोबर पर्यंत राहणार आहे. त्या अनुषंगाने आज अस्तंबा येथे ग्रामस्थ व पोलीस प्रशासनाची संयुक्त बैठक संपन्न झाली. या बैठकीला धडगाव पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप,सरपंच वनसिंग वळवी,पोलीस पाटील अंबिलाल वसावे सामाजिक कार्यकर्ते पोपटा वसावे आदी उपस्थित होते. बैठकीत ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांच्या अडी अडचणी जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या त्यात अस्तंबा यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. यात्रेत येणाऱ्या भाविकांसाठी ग्रामस्थांनी पार्किंग साठी जागा उपलब्ध करून द्यावी जेणेकरुन बाहेरील येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही. यात्रेदरम्यान अस्तंबा यात्रा उत्सव समितीमार्फत गावातील स्वयंसेवक नेमावेत.



यात्रेदरम्यान गावात दारुबंदी राहणार असुन दारुची विक्री होणार नाही. यात्रेत डीजे डॉल्बी सारख्या साऊंड सिस्टीमला बंदी असल्यामुळे कोणीही यात्रेत डीजे डॉल्बी अथवा बँड लावू नये ग्रामस्थांनी आपल्या गावातील यात्रा शांततेत पार पडेल याकरिता प्रशासनास सहकार्य करावे इत्यादी प्रकारच्या सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. सदर बैठकीस माजी सरपंच पोपटा वसावे, मानसिंग वळवी, ट्रस्ट अध्यक्ष धिरसिंग वळवी, नवा वसावे, मालसिंग वळवी, माधव वळवी, अमर वळवी, विलास वळवी,खिमजी वळवी, इंदया वळवी, फोज्या वळवी, दिलीप वळवी, तुंबड्या वळवी आदींसह हवालदार पुष्पेंद्र कोळी पो.कॉ.निलेश पानपाटील पो.कॉ.सुनिल सुर्यवंशी पो.कॉ.मानसिंग वळवी पो.कॉ.शिवलाल तलाठी मंगेश पराडके, ग्रामसेवक मोहन वळवी, तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी संजय पावरा उपस्थित होते.

### कायदा व सुव्यवस्थेचा अबाधित ठेवा:- राजेंद्र जगताप

**बैठकीत पोलीस निरीक्षक जगताप यांनी गाव पातळीवर यात्रा उत्सव समिती नेमून त्यांची यादी पोलीस प्रशासनाकडे सादर करावी, परिसरात काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी समितीतर्फे ड्रोन कॅमेरा लावण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. तर गावात कुठलेही अवैद्य धंदे सुरु राहणार नाही अशा सूचनाही जगताप यांनी दिल्या. शिवाय शांतता ठेवत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु नये असे आवाहन देखील त्यांनी केले.**

# शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारने त्वरित लक्ष द्यावे-भारतीय किसान संघाची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतीय किसान संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस,तहसीलदार, केज यांच्या माध्यमातून निवेदन सादर करण्यात आले.शेतकऱ्यांवर आलेल्या नैसर्गिकआपत्ती आणि अपुऱ्या सरकारी योजनेच्या अंमलबजावणी मुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बिकटझाल्याने या निवेदनात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.निवेदनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत



१.PM-ASHA योजनेअंतर्गत सोयाबीन, भात,कडधान्ये,मका, कापूस आदी पिकांची सरकारी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत. शेतमालाची चडझ (किमान आधारभूत किंमत) नुसार खरेदी करून माल परत न करता केंद्रावरच स्वीकारावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

२.अतीवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना मदतनिधी वाटप करावे,अशी मागणी करण्यात आली.सध्या सणासुदीचे दिवस सुरू असल्याने नुकसान भरपाई त्वरित मिळणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले.

३.पिक विमा योजनेतील बदल मागे घ्यावेत आणि गतवर्षीचेच नियम लागू करावेत,अशी मागणी संघाने केली आहे. प्रीमियम योजना बंद झाल्याने अनेकप्रामाणिक शेतकरी योजनेपासून वंचित राहिल्याचेही निवेदनात नमूद आहे.

४.ई-पिक पाहणी अप मध्ये तांत्रिक अडचणी असल्याने अनेक शेतकरी नोंदणी करू शकले नाहीत.त्यामुळे दि.३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देऊन सर्वर आणि अप मधील त्रुटी दूर कराव्यात,तसेचआवश्यक असल्यास ग्रामपंचायती मार्फत माहिती घेऊन नोंद करावी,अशी मागणीही करण्यात आली.

५.कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या सीसीआय हमीभाव खरेदीसाठी कपास किसान अप वर ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदणी करण्याची मुदत वाढ देऊन त्याची खात्री शेतकऱ्यांना मोबाईलवर पाठवावी,अशीही मागणी करण्यात आली आहे. संघाच्या प्रतिनिधींनी सांगितले की,एप्रिलपासून अस्थिर पावसामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे.अशा वेळी सरकारने संवेदनशीलतेने निर्णय घेऊन दिलासा द्यावा.या निवेदनावर शशिकांत गहाणे,धनंजय गव्हाणे,बालासाहेब शिंदे, विक्रांत शिंदे,भागवत शिंदे आदी किसान बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. संघाने पुढे इशारा दिला की,सरकारने मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास मोर्चे,धरणे आणि ठिय्या आंदोलनाचे टप्प्याटप्प्याने आयोजन करण्यात येईल. असा इशारा ही भारतीय किसान संघ बीड जिल्हा, केज तालुका यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# बीडमध्ये बंदी घातलेल्या रेस्पीफ्रेश टीआर सिरपचा साठा ५००बाटल्या जप्त, सॅम्पल तपासणीसाठी संभाजीनगरला

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात रेस्पीफ्रेश टीआर या बंदी घातलेल्या कफ सिरपचा साठा सापडल्याने खळबळ उडाली आहे.तब्बल ५०० हून अधिक बाटल्या जिल्ह्यात आढळल्या असून औषध प्रशासनाने तपास सुरू केला आहे. गेवराई येथून काही नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत.मात्र,धक्कादायक म्हणजे ज्या बॅचमुळे मध्यप्रदेशात बालकांचे मृत्यू झाले होते,त्या बॅच ऐवजी दुसऱ्या बॅचचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. तपासणी अहवाल आल्यानंतर सिरपमधील डीईजीचे प्रमाण स्पष्ट होणार आहे.सहायक आयुक्त एम.जे.निमसे यांनी याची माहिती दिली असून जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांवर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.




# केज तालुक्यातील ग्रामीण भागात शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने किराणा किट वाटप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने केज तालुक्यातील राजेगाव, बोरगाव,दैठणा येथील पूरग्रस्तांना संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या हस्ते व मुंबई नगरसेवक बाळा चव्हाण यांचा सहकार्याने किराणा किट वाटप करण्यात आले.

अतिवृष्टीमुळे केज तालुक्यातील अनेक गावात पिकाचे नुकसान तसेच पूर परिस्थितीमुळे घराचे नुकसान झालेले आहे.यामध्ये संसाराची राख रांगोळी झालेली दिसून येत आहे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने एक सामाजिक बांधिलकी म्हणून बीड जिल्हा बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या हस्ते पूरग्रस्तांना २०० किराणा किट चे वाटप मौजे बोरगाव,दैठणा, राजेगाव या ठिकाणी वाटप करण्यात आले यावेळी जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, जिल्हा संघटक नितीन धांडे,तालुकाप्रमुख अशोक जाधव,शहर प्रमुख तात्या रोडे सह प्रभाकर शिंदे, समीर जाधव,धर्मेश सकपाळ आदि शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.



# जेष्ठ व्यापारी रामेश्वरजी जाजू यांचा तिरुपती वारी तील सलग ६० वर्षांच्या परंपरेबद्दल सकल ब्राह्मण संघर्ष समितीच्या वतीने भव्य सत्कार संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील प्रसिद्ध व्यापारी व समाजसेवक रामेश्वरजी जाजू यांचा तिरुपती बालाजीच्या ब्रह्मोत्सव वारीतील सलग ६० वर्षांच्या निष्ठावान सहभागाबद्दल समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीनेनुकताच भव्य सत्कार करण्यात आला.ही वारी त्यांच्या वडिलांनी सुरू केलेली परंपरा असून,रामेश्वरजी यांनी ती निष्ठेने अखंडपणे पुढे चालवली आहे.रामेश्वरजी जाजू यांनी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत तिरुपती बालाजीच्या ब्रह्मोत्सव वारीसाठी दरवर्षी सलग ६० वर्षे नियमित हजेरी लावली आहे.ही परंपरा त्यांचा मुलगा महेश जाजू हे देखील समर्थपणे पुढे चालवत आहेत.विशेष म्हणजे,सध्या वयाच्या ७७ व्या वर्षात असलेले रामेश्वरजी जाजु यांना नुकतेच एक आजारपण भोगावे लागले,मात्र त्यातून सावरताच त्यांची तिरुपती बालाजीवरची श्रद्धा पुन्हा नव्याने जागृत झाली असून,येणाऱ्या ब्रह्मोत्सवात सहभागी होण्याची त्यांची तीव्र इच्छा आहे.या सत्कार समारंभात संघर्ष समिती चे संस्थापक धनंजय कुलकर्णी,ब्राह्मण पुरोहित कल्याण समितीचे प्रदेशाध्यक्ष श्रीनिवास केजकर,ब्राह्मण व्यवसाय कल्याण समितीचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष शिवराज मुथळे, तसेच गोविंद जाजू आणि महेश जाजू यांची विशेष उपस्थिती होती.समाजासाठी प्रेरणास्थान ठरलेल्या रामेश्वरजी जाजू यांच्या या निष्ठेचे व श्रद्धेचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांनी निर्माण केलेली ही भक्तीची परंपरा पुढील पिढ्यांसाठीही आदर्श ठरत आहे.त्यांच्या या सेवाभावी आणि श्रद्धेच्या कार्याची दखल घेऊन समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीने दिलेला हा गौरव निश्चितच त्यांच्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ठरला आहे.



# पोलिसांचा वर्दीचा गैरवापर; शेतकऱ्यांना धमक्या, आणि जवानांवर खोटे गुन्हे

## ऑल इंडिया पँथर सेनेकडून निलंबनाची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पोलिस विभागातील गंभीर कारभारी घटनांनी खळबळ उडवली आहे. शेतकऱ्यांना धमकावणे, संशयितांना अमानुष मारहाण करणे आणि देशसेवा करणाऱ्या जवानांवर खोटे गुन्हे दाखल करणे यांसारख्या प्रकारांमुळे पोलिसांच्या वर्दीचा गैरवापर झाल्याचा आरोप होत आहे. ऑल इंडिया पँथर सेनेने या प्रकरणांमध्ये दोषी पोलिस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली असून, पिडितांना न्याय मिळवून देण्याची विनंती बीडचे पोलिस अधीक्षक यांना केली आहे.नेकनूर पोलीस स्टेशनमध्ये शेतकऱ्याला धमकीजिल्ह्यातील नेकनूर पोलीस स्टेशन अंतर्गत पवनचक्की कंपनीच्या नुकसानभरपाई (मावेजा) मिळाल्याबाबत वाद सुरू असताना एका शेतकऱ्याला पोलिसांनी 'तुझे कॅरेक्टर खराब करून टाकीन' अशी धमकी दिल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा शेतकरी न्याय मागत असल्याचे सांगितले जाते, तर त्याच्या णझडउ परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांना धमकावण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पँथर सेनेच्या कार्यकर्त्यांनी याला पोलिसांचा कायद्याचा भंग असल्याचे म्हटले आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये पोलिस शेतकऱ्याला थेट धमकावताना दिसत आहेत, ज्यामुळे बीड पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

आष्टी पोलीस स्टेशन अंतर्गत अमानुष मारहाणगेल्या काही दिवसांपूर्वी आष्टी पोलीस स्टेशन अंतर्गत कडा चौकी येथे अविनाश सोनवणे यांना संशयित म्हणून अमानुष मारहाण करण्यात आली होती. बेल्ट, काठी आणि लाथा-बुक्यांनी त्यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर प्रसारित झाले असून, डीवायएसपी आष्टी यांनी पिडिताची जाब विचार घेतली आहे. मात्र, अद्याप दोषी पोलिस कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बीडचे पोलिस अधीक्षक यांना निवेदन देऊन दोषी पोलिसांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे.ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी सांगितले, या प्रकारामुळे सामान्य माणसाचा पोलिसांवर विश्वास उडत आहे. पिडिताला न्याय मिळालाच पाहिजे.

जवान रोहित सोनवणे यांच्यावर खोटा गुन्हागेल्या चार महिन्यांत बीडमधील एका महिला पोलिस आणि दोन पोलिस कर्मचाऱ्यांनी खाकी वर्दी आणि कायद्याचा गैरवापर करून आसाम येथे कार्यरत असलेल्या भारतीय जवान रोहित सोनवणे यांच्याविरुद्ध खोटी छउ (नॉन कॉग्निझेबल) दाखल केली होती. त्या वेळी रोहित सोनवणे आसाममध्ये ड्युटीवर असल्याने ते न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. यामुळे कार्यकारी दंडाधिकारी बीड यांच्या न्यायालयाने त्यांना ५,००० रुपयांचा दंड ठोठावला. या घटनेमुळे जवानांच्या सेवेचा अपमान झाल्याचा आरोप होत असून,ऑल इंडिया पँथर सेनेने अशा पोलिसांना बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. जानून बुजून देशसेवक जवानाला त्रास देणाऱ्या पोलिसांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे सेनेचे नेते नितीन सोनवणे म्हणाले.पँथर सेनेची निषेधाची भूमिका आणि मागण्याया सर्व घटनांमुळे बीड पोलिसांचा 'कारनामा' उघड झाल्याचे पँथर सेनेचे म्हणणे आहे. शेतकरी न्याय कोणाकडे मागावा, असा प्रश्न उपस्थित करत ऑल इंडिया पँथर सेनेने पोलिस अधीक्षक बीड यांना विनंती केली आहे की, दोषी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी आणि पिडितांना न्याय मिळवून द्यावा. महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी सांगितले, पोलिस बांधवच असे बोलत असतील तर सामान्य माणूस कुठे न्याय मागणार? ही घटना दाबण्याचा प्रयत्न होत असेल तर आम्ही आंदोलन करू. पँथर सेनेने उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले आणि पालकमंत्री यांनाही निवेदने पाठवली आहेत. या प्रकरणांवर बीड पोलिस अधीक्षकांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र, या घटनांमुळे जिल्ह्यातील सामाजिक तणाव वाढला असून, न्यायव्यवस्थेवर विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पँथर सेना आंदोलनाची तयारी करत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# बालाजी देडगाव मधून द्वारका धाम साठी भाविक प्रस्थान



दैनिक वादळ वार्ता
**नेवासा । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथून बालाजी मंदिर मधून द्वारका धाम साठी भाविक प्रस्थान गुरुवार दिनांक ९ रोजी संध्याकाळी ठीक सात वाजता देडगाव परिसरातून द्वारका धाम साठी ४९ प्रवासी प्रस्थान झाले आहे त्यावेळी गाडीची महापूजा करण्यात आली या पूजेचे मानकरी राधाकिसन चेडे व यांची पत्नी पुष्पा चेडे यांच्या हस्ते गाडीची पूजा करण्यात आली पूजा साठी ब्रह्मण देवा राजू देवा तांदळे यांच्या हस्ते करण्यात आली त्यावेळी बालाजी देवस्थानचे अध्यक्ष नवनाथ मुंगसे ज्ञानदेव कदम माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे विद्यमान सरपंच चंद्रकांत मुंगसे बालाजी देवस्थानचे विश्वस्त सुनील मुथा संभाजीराजे काजळे गंगाधर तांबे योगेश चेडे विलास मुंगसे भगवान मुंगसे भीमराज मुंगसे गणेश आवटी अशोक मुंगसे बंशी मुंगसे मधु देवा तांदळे बालाजी देवस्थानचे विश्वस्तव बाळासाहेब मुंगसे महादेव मुंगसे जालिंदर जालिंदर लाडके किशोर मुंगसे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवेसाठी विद्यार्थ्यांचा यशस्वी लढा

## बोरद-मोडकढेल मार्गावरील बस सुरू

दैनिक वादळ वार्ता
**बोरद । मंगेश पाटील**



गेल्या पंधरा दिवसांपासून बंद असलेली शहादा आगारातून सुटणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (चडठढउ) शहादा-बोरद-मोडकढेल बस सेवा अखेर सुरू झाली आहे. दिनांक ६ ऑक्टोबर पासून ही बस सेवा पुन्हा सुरू झाल्यामुळे परिसरातील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये मोठे समाधान व्यक्त होत आहे.

बस सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत होते, तसेच परिसरातील ग्रामस्थांचे शहादा येथे जाण्यासाठी खूप हाल होत होते. या समस्येमुळे त्रस्त झालेल्या विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी शहादा आगार प्रमुखांना लेखी निवेदन देऊन आपली व्यथा मांडली होती.

प्रशासनाने घेतली बातमीची दखल
विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि ग्रामस्थांचे हाल थांबवण्यासाठी शहादा एसटी महामंडळाच्या आगार प्रमुखांनी ही बस सेवा त्वरित सुरू करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, 'दै. वादल वार्ता वृत्तपत्राने या समस्येवर नुकतीच बातमी प्रसिद्ध केली होती, ज्याची दखल घेऊन महामंडळ प्रशासनाने ही बस सेवा अखेर सुरू केली. तसेच, मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांनीही एसटी प्रशासनाला बस सुरू करण्याबाबत सूचित केले होते.

सध्या शहादा-बोरद-मोडकढेल ही बस सेवा सुरू झाल्याने महामंडळालाही आर्थिक लाभ होणार असून नागरिकांचे हाल थांबतील. ही सेवा सुरू झाल्याने समाधान व्यक्त करत असतानाच, महामंडळाने पूर्वीप्रमाणेच या मार्गावरील बसच्या फेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांकडून जोर धरत आहे.

# कोजागिरी पौर्णिमेनिमित्त पारंपरिक वेशभूषेत महिलांचा संस्कृतीचा जल्लोष

दैनिक वादळ वार्ता
**बोरद । मंगेश पाटील**



कोजागिरी पौर्णिमेच्या चांदण्यांनी उजळलेल्या रात्री शंकर काशीराम नगर परिसरात उत्साह, आनंद आणि संस्कृतीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या निमित्ताने येथील महिलांनी एक आगळीवेगळी कल्पना राबवली घरातील जुन्या पारंपरिक कामांचे देखावे साकारून आपल्या संस्कृतीचा वारसा जिवंत ठेवणे.

महिलांनी नऊवारी साड्या, पारंपरिक दागिने आणि जुन्या काळातील वेशभूषा परिधान करून आपल्या संस्कृतीचा झगमगता वारसा साकारला. त्यांनी गहू पांखरणे, दळणे, दही करणे, रांगोळी काढणे, तुळशीची पूजा करणे, चुलीवर स्वयंपाक करणे, विठ्ठल पुजन करणे अशा घरगुती कामांचे देखावे सादर केले. या सादरीकरणातून प्रेक्षकांना जुन्या काळातील स्त्रियांच्या कष्टमय पण संस्कारमय जीवनाची झलक अनुभवायला मिळाली.

कार्यक्रमात 'आपली परंपरा आपला अभिमान' या संकल्पनेवर आधारित स्पर्धा घेण्यात आली होती. प्रत्येक सहभागी महिलेने आपल्या पोशाख, सादरीकरण आणि शैलीतून महाराष्ट्राच्या परंपरेची झलक सुंदरपणे सादर केली.चांदण्यांच्या प्रकाशात दुधाचा शिरा, गरम दूध आणि हास्य-विनोदांच्या गप्पा यांनी हा सोहळा अधिकच रंगतदार झाला. महिलांच्या उत्साही सहभागामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

एकंदरीत,काशिराम शंकर नगरमधील कोजागिरी पौर्णिमेचा हा सोहळा फक्त चंद्रप्रकाशाचा नव्हे, तर संस्कृती, सौंदर्य आणि स्त्रीशक्तीच्या तेजाने उजळलेला ठरला! कार्यक्रम यशस्वीतेसाठी सपना सजनकार, शितल चिंचोले, निरुपमा कर्णकार,रीना पटेल,रुचना चौधरी, लक्ष्मी सजनकार,रत्ना पटेल, कविता मराठे,छाया कुंवर,सोनल माळी यांनी परिश्रम घेतले.

# रायगड जिल्हा काँग्रेसच्या आढावा बैठका व जनसंपर्क कार्यालयांचे उद्घाटन उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**उरण। प्रतिनिधी**



रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या मार्गदर्शनाखाली ८ व ९ ऑक्टोबर २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या. रोहा, तळा, महाड आणि माणगाव या तालुक्यांतील बैठकीत स्थानिक स्तरावरील पक्ष कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठका यशस्वीपणे पार पडण्यासाठी रोहा तालुका काँग्रेस अध्यक्ष सुनील देशमुख, तळा तालुका अध्यक्ष शरद भोसले, माणगाव तालुका अध्यक्ष विलास सुर्वे आणि महाड तालुका अध्यक्ष उमेश तांबे यांनी आपल्या तालुक्यांमध्ये बैठकीचे अत्यंत प्रभावी नियोजन केले.या दौऱ्यादरम्यान तळा, माणगाव आणि महाड येथे काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयांचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमांना कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विशेषतः तळा तालुक्यात या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नव्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून, त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्यासोबत अल्पसंख्याक विभाग रायगड अध्यक्ष अखलाख शिलोत्री, रायगड काँग्रेस उपाध्यक्ष किरीट पाटील, पनवेल ओबीसी सेल अध्यक्ष वैभव पाटील यांच्यासह विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठका आणि उद्घाटन कार्यक्रमांच्या माध्यमातून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला असून, आगामी निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह निर्माण झाला आहे.

# लाईफ हेल्थ क्लब, लाईफ स्टाईल जिमचे खेळाडूंचा सत्कार



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील आर्म स्पोर्टस असोसिएशन , लाईफ हेल्थ क्लब , लाईफ स्टाईल जिम,वेट लिफ्टिंग अकॅडमी महात्मा फुले शॉपिंग सेंटर नवी भाजी मंडई बीड च्या खेळाडूंचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर ( औरंगाबाद ) व एस.डी. महाविद्यालय सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजी नगर यांचे संयुक्त विदमाने संपन्न झालेल्या अंतर महाविध्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत शेख शयान अहमद ( रौप्य पदक ), घेणे सुदर्शन बालाजी ( रौप्य पदक ) व प्रवण विक्रम जाधव ( कांस्य पदक ) मिळवले. या यशाबद्दल खेळाडूंचे व प्रशिक्षक शेख वसीम यांचे बॉडी बिल्डिंग, वेट लिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने व बीड जिल्हा पॉवर लिफ्टिंग असोसिएशन चे सचिव सय्यद अमानउल्लाह अरशियानउल्लाह, मुकर्मजान पठाण ,शमशीर खान सर, सोनवणे फुलचंद गोविंद गणेश गोळप शेख अमजद रेहान खान फैजान खान यानी सत्कार करून अभिनंदन केले.

# अनुदानाची रक्कम कर्ज खात्यात वळती करत असेल तर खबरदार-सामाजिक कार्यकर्ते माणिक दादा चव्हाण

दैनिक वादळ वार्ता **नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात सलग्न पाच वेळा झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे नांदेड जिल्ह्याला महापुराने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावरती अतोनात नुकसान झालेले आहे अक्षरशः शेतकरी हवालदिल झालेला आहे



शाळेतील लेकरांची फीस, दिवाळी उत्सव सन साजरा करणे ही शेतकऱ्याकडे उरलेले नाही व शेतात पिक राहिलेले नाही अशातच शासनाकडून मिळणारी तुटपुजी मदत वेळेवर मिळत नाही शेतकऱ्यांच्या स्वप्नाचा सपना चोरी झाला आहे व मिळणारी अनुदानाची रक्कम बँकांनी होल्ड लावून शेतकऱ्याची पिळवणूक केली जात आहे यामुळे शेतकरी अधिकच चिंताग्रस्त झालेला आहे अनुदानाची रक्कम ही शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे यासाठी नायगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांचे समर्थक यांनी आज थेट शेतकऱ्यांचा देवदूत होऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे जर शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम कोणत्याही बँक कर्मचाऱ्यांनी अनुदानाची रक्कम कर्ज खात्यात वळती केली तर शेतकऱ्यांनी थेट माणिक दादा चव्हाण यांच्याशी संपर्क साधून आपल्या अडचणी दूर करून घ्याव्यात व कोणत्याही शेतकऱ्यांना कुठे अडचण उद्भवत असेल किंवा अधिकारी जाणून बुजून त्रास देत असेल तर यावर वाचा फोडण्यासाठी मी उभा आहे असे त्यांनी सांगितले कृपया शेतकऱ्यांनी यांच्याशी सभा साधून आपल्या अडचणी दूर कराव्यात असे ते म्हणाले यामुळे शेतकऱ्याच्या अडचणी निश्चितच दूर होतील

# फॅशन रंगभूमीवर तुलसीचा डंका

## पुण्यातील ओडिसी फॅशन शोमध्ये महाविद्यालयाला द्वितीय क्रमांकाचा मान

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**




कस्तुरी रायझ फाऊंडेशन आणि मनसी फिल्म्स प्रॉडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित द फॅशन ओडिसी मिस अँड मिसेस इंडिया सिनेमा क्वीन व प्राईड ऑफ इंडिया एक्सलन्सी अवॉर्ड्स हा भव्य फॅशन शो रविवारी, ५ ऑक्टोबर २०२५ रोजी पुण्यात जल्लोषात पार पडला.या राष्ट्रीय फॅशन शोमध्ये तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करून राष्ट्रीय पातळीवर आपली छाप उमटवली. वैष्णवी होके हिने वैयक्तिकरीत्या द्वितीय क्रमांक पटकावला, तर प्रिती ससाणे आणि संघमित्रा गायकवाड यांनी टॉप-टेनमध्ये आपले स्थान मिळवले. या यशामुळे महाविद्यालयालाही द्वितीय क्रमांकाचा सन्मान प्राप्त झाला.

या विजयामुळे महाविद्यालयीन परिसरात जल्लोषाचे वातावरण पसरले. तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थिनींच्या मेहनतीचे कौतुक करत संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच संस्थेचे विश्वस्त डॉ. सुनील जोंधळे आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांनी प्रा.रंजना जोगदंड, श्री.बबन पांचाळ यांच्यासह संपूर्ण मार्गदर्शक टीमचे अभिनंदन करत हा क्षण तुलसी कॉलेजसाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी असल्याचे गौरवले.

# उपोषण केले बेदखल केले म्हणून जल समाधी घेण्याचा इशारा-प्रशासन झाले अलर्ट

## सहा दिवस झाले तरी आमरण उपोषण आणि बैलगाडी पेटवून झाले तरी प्रशासन जागचे हलेना

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

सहा दिवसा पासून धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान वतीने कोरडेवाडी येथे राजश्री ताई उमरे पाटील या अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ५० हजार नुकसान भरपाई देण्यात यावी. ज्ञानाराधा मधील ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यात याव्यात आणि कोरडेवाडीच्या नियोजित साठवण तलावाला पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे. या प्रमुख मागण्यांसह इत्तर मागण्यासाठी उपोषणाला बसल्या आहेत. मात्र त्यांच्या उपोषणाची प्रशासनाने दखल घेतली नसल्याने उद्या दि. ११ ऑक्टोबर रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे कार्यकर्ते हे जलसमाधी घेणार आहेत. तसेच दोन दिवसापूर्वी राजश्रीताई उमरे पाटील यांच्या समर्थनासाठी आंदोलकांनी केज तहसीलच्या आवारात बैलगाडीला आग लावली होती. त्यामुळे आता प्रशासन अलर्ट झाले आहे.

या बाबतची माहिती अशी की, धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्रीताई उमरे पाटील यांचे सहा दिवसा पासून कोरडेवाडी तालुका केज येथे उपोषण सुरू आहे. त्यांची प्रकृती दिवसें दिवस खालावत आहे. तरी देखील सरकार याकडे गांभीर्याने पाहत नसल्याने आता गावकरी आणि कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता टोकावाडी आणि कोरडेवाडी या दरम्यानच्या तलावात धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानचे कार्यकर्ते हे जलसमाधी घेणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. उपोषणकर्त्या राजश्रीताई उमरे पाटील यांनी सरकारकडे; कोरडेवाडी येथील साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे.




मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहिर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रु. सरसकट अर्थिक मदत करण्यात यावी. ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांचे संरक्षण व थकीत रक्कम परत देण्याबाबत.

ज्ञानराधा बँकेची स्थावर व जंगम मालमत्ता शासनाच्या ताब्यात घेऊन त्याचा लिलाव करून त्यातून मिळालेल उत्पन्नातून ठेवीदारांचे पैसे तातडीने परत करण्यात यावेत. शेतकरी कर्जमाफी करण्यात यावी आणि शैक्षिणिक फीस माफ करण्यात यावी. या त्यांच्या पाच प्रमुख मागण्या आहेत. उपोषणाला सात दिवस उलटून गेले आहेत.

_ दि. ८ ऑक्टोबर रोजी राजश्री ताई उमरे पाटील यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने संतप्त कार्यकर्त्यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे संस्थापक बाळराजे आवारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली केज तहसील कार्यालया समोर बैलगाडी पेटवून दिली होती. त्यामुळे आता उद्याच्या जलसमाधी घेण्याच्या इशाऱ्यामुळे प्रशासन दक्षता घेत आहे. जलसमाधी आंदोलना दरम्यान काही अघटीत घटना घडू नये याची खबरदारी घेण्यात येत आहे.

# माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्थांना श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचा मदतीचा हात

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

नवरात्रौत्सवात बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी व सिंधफणा नदीच्या काठावर असलेल्या गावांना पुराचा तडाखा मोठ्या प्रमाणात बसला अनेक कुटुंबांची आर्थिक स्वरूपात नुकसान झाले. अशावेळी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने गुरुपुत्र नितीन भाऊ मोरे यांच्या उपस्थितीत माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, मंजरथ , देपेगाव , सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला येथील पुरग्रस्थांना किराणा किट्स, साड्या, ब्लँकेट इतर जीवनावश्यक वस्तू देऊन मदत करण्यात आली या स्तुत्य व समाजोपयोगी



उपक्रमांमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल तसेच बीड जिल्हा मराठी पत्रकार संघानेही आपले योगदान दिले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान सोनवणे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ शामसुंदर काकाणी, डॉ शिवाजीराव काकडे, डॉ यशवंत राजेभोसले, डॉ अशोक घुबडे, डॉ अभिजित सोळंके, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे पांडुरंग चांडक, मराठी पत्रकार संघाचे हरिष यादव, पांडुरंग उगले, सावंत तसेच सर्व पत्रकार बांधव, माजलगाव तालुक्यातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सेवेकरी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चमकले ब्लू बेल्स शाळेचे विद्यार्थी

दैनिक वादळ वार्ता
**नायगांव । हनुमंत चंदनकर**

नांदेड येथील ज्ञानमाता विद्याविहार येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत एकुण १८ शाळा सहभागी झाल्या होत्या.त्यात नागपूर , जालना, औरंगाबाद तसेच नांदेड जिल्ह्यातील नामांकित शाळांचा समावेश होता. या स्पर्धेचा विषय होता ' समाजात सुसंवाद साधण्यासाठी नैतिक मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत'.प्रत्येक शाळेचे ३ असे एकूण ५४ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत ब्लू बेल्सच्या विद्यार्थ्यांनींनी बाजी मारली.विषयाच्या बाजूने प्रथम बक्षीस_ कु.खुशी भिमराव भवरे हिने पटकावले तर विषयाच्या विरुद्ध बाजूने प्रथम बक्षीस



कु.खुशी बालाजी पवार हिने पटकावले.या दोघींनाही मिळालेल्या बक्षीसांचे स्वरूप प्रत्येकी रू .५००१ रोख व स्मृतिचिन्ह असे होते.यासमवेतच कु.समृद्धी विलास पाटील हिनेही इंटरजेक्टर ची भुमिका उत्कृष्टपणे निभावली आहे.या सर्व स्पर्धकांच्या सर्वोत्तम सादरीकरणामुळे ब्लू बेल्स शाळेला ''सर्वोत्कृष्ट शाळा ' हा सन्मान बहाल करण्यात आला.विशेष म्हणजे ब्लू बेल्सला हा बहुमान सलग तीन वर्षांपासून मिळत आहे.या विद्यार्थ्यांना सौ.वर्षा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.राधाई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सन्माननीय डॉ.के .हरीबाबू सर , मुख्याध्यापिका सौ.लक्ष्मी मॅम, सहसल्लागार डॉ.सौ.साईदिप्ती मॅम, शाळेचे पर्यवेक्षक दत्ता कंदुरके सर व सर्व शिक्षकवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.या नेत्रदीपक यशामुळे पालक वर्गामध्ये सर्वत्र ब्लू बेल्स शाळेचे कौतुक होत आहे.

## काशीराम शंकर नगरमध्ये कोजागिरीच'टाइम ट्रॅव्हल' उत्सव!

# पारंपरिक वेशभूषेत महिलांनी साकारले जुन्या काळातील संस्कार

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आजच्या धकाधकीच्या युगात आपली संस्कृती विसरू पाहणाऱ्यांसाठी नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा येथील काशीराम शंकर नगरच्या महिलांनी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने एक अभूतपूर्व 'कल्चरल स्टेटमेंट' दिले! चांदण्यांच्या शीतल प्रकाशात, नऊवारी साड्या, पारंपरिक दागिने आणि जुन्या पद्धतीच्या वेशभूषेत नटलेल्या महिलांनी अक्षरशः 'टाइम मशीन' मधून प्रवास घडवला. या महिलांनी केवळ रांगोळी काढणे किंवा पूजा करणे इतकेच नाही, तर 'घरातील जुन्या पारंपरिक कामांचे देखावे' साकारून उपस्थितांना थक्क केले. गहू पांखरणे,



जात्यावर दळणे, चुलीवर स्वयंपाक करणे आणि पारंपरिक पद्धतीने दही करणे... हे सर्व देखावे सादर करत त्यांनी जुन्या काळातील स्त्रियांचा कष्टमय पण संस्कारमय जीवनपट डोळ्यासमोर उभा केला. हा देखावा म्हणजे 'आपली परंपरा, आपला अभिमान' या संकल्पनेचा जिवंत अविष्कार होता. हा सोहळा फक्त चंद्रप्रकाशाने नाही, तर स्त्रीशक्ती आणि संस्कृतीच्या तेजाने उजळला. स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेने आपल्या सादरीकरण आणि शैलीतून महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेची जादू दाखवली. कार्यक्रमाच्या शेवटी, चांदण्यात गरम दूध आणि दुधाच्या शिऱ्याची मेजवानी झाली, ज्यामुळे हा उत्साह अधिकच वाढला. सपना सजनकार, शितल चिंचोले, निरुपमा कर्णकार, रीना पटेल, रुचना चौधरी, लक्ष्मी सजनकार, रत्ना पटेल, कविता मराठे, छाया कुंवर, सोनल माळी, आणि पूजा शेंडे यांच्या अथक परिश्रमातून हा 'स्मरणार्थ' सोहळा यशस्वी झाला. एकंदरीत, काशीराम शंकर नगरमधील ही कोजागिरी पौर्णिमा म्हणजे संस्कृती जतन करण्याचा एक धमाकेदार संदेश ठरली!

# नंदुरबार जिल्हा: पंचायत समिती सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोबरला!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आगामी पंचायत समिती निवडणुकांनंतर गठित होणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत अखेर जाहीर झाली आहे. पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी असणाऱ्या या पदांसाठी सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडत काढण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बिरसा मुंडा सभागृहात दुपारी १२.०० वाजता ही सोडत प्रक्रिया पार पडेल. उपजिल्हाधिकारी (महसूल) प्रमोद भामरे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये ही माहिती कळविली आहे.अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी हे सभापती पद आरक्षित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील रहिवाश्यांनी आणि सर्व नागरिकांनी या महत्त्वाच्या



सोडतीच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी श्री. भामरे यांनी केले आहे.

या सोडतीमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापणार असून, आगामी निवडणुकांमध्ये सभापती पदासाठी कोणत्या पंचायत समितीला कोणते आरक्षण मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राजकारणांत समोरा-समोर लढु परंतु सामाजिक प्रश्नी कायम सर्वांसोबत-आमदार प्रकाश सोळंके

## माजलगावात छ.शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांचे भुमिपुजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

राजकारणांत समोरा – समोर लढु परंतु सामाजिक प्रश्नी कायम सर्वांसोबत असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगीतले. शहरातील नविन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे तर जुन्या बसस्थानकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होणार असुन या स्मारकाच्या भुमिपुजन कार्यक्रमात दि. १० शुक्रवारी ते बोलत होते.

अध्यक्षस्थांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप हे तर उद्घाटक म्हणुन आमदार प्रकाश सोळंके होते. या कार्यक्रमास माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, बाबुराव पोटभरे, अच्युत लाटे, दयानंद स्वामी, उपसभापती श्रीहरी मोरे, जयसिंह सोळंके, विरेंद्र सोळंके, खुर्शिद नाईक, सभापती जयदत्त नरवडे, विजय साळवे, अविनाश जावळे, डॉ. अशोक तिडके, खलील पटेल, कचरू खळगे, नासेर पठाण, सुरेंद्र रेदासनी नवनाथ धाईजे, अभिजित पोटभरे, अभय होके पाटील, भिमराव टाकणखार, अरूण राउत, अर्जुन नाईकनवरे, धम्मानंद साळवे, भास्कर शिंदे, राजेश साळवे, अमोल शेरकर, संतोष जेथलिया ईश्वर खुरपे सिध्दार्थ ससाणे, राकेश साळवे, दिनकर शिंदे, उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस विलास नेमाणे, विठ्ठल तुपसौंदर, अभिजित कोंबडे, आगार प्रमुख सुहास कोळपकर मुख्याधिकारी पोपट निघळ यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक व दोन्ही चौकांचे सुशोभिकरण दर्जेदार करण्यात येणार आहे असे सांगीतले



तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी सांगीतले की, महापुरूषांचे स्मारक यातुन त्यांची प्रेरणा मिळते. हे दोन्ही स्मारक माजलगावकरांच्या अस्मितेचा प्रश्न होता. मार्गी लागला यामागे सर्व माजलगावकरांचे श्रेय आहे. यावेळी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांनी १९७८ पासुन या दोन्ही स्मारकांच्या पाठपुराव्याचा आलेख सर्वांसमोर मांडला तर यावेळी विजय साळवे, अविनाश जावळे, दयानंद स्वामी यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन धनंजय सोळंके तर आभार तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी मानले. माजलगाव मतदारसंघामध्ये नगरविकास खात्यामार्फत उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी भरिव निधी दिलेला असल्याने मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली आहेत. शहरामध्ये होत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य – दिव्य स्मारकांकरीता ना. एकनाथराव शिंदे यांचेकडुन मोठ्या प्रमाणावर निधी आणण्यात येईल. आगामी नगरपालिका निवडणुकीत माजलगाव नगरपालिकेचे नगराध्यक्षपद शिवसेनेसाठी सोडावे असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सांगीतले. शहरातील जुन्या बसस्थानकात भव्यदिव्य असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होणार असनु नविन बस्थानकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार आहे. या स्मारकाच्या भुमिपुजनाचे आयोजन शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, धनंजय सोळंके, अभिजित कोंबडे यांनी केले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077